वन विभागाची पुनर्रचना व्यवस्थापकीय माहिती प्रणाली अंतर्गत सांख्यिकी विषयक निर्माण केलेल्या पदांना सन २०१७-१८ मध्ये मुदतवाढ देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांक :-एफडीएम -२०१७/प्र.क्र.२०/फ-२

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

दिनांक :- १८ जानेवारी, २०१८

वाचावे :- १) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.०८/१६/आ.पु.क., दि.०३.१०.२०१७

२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. एफडीएम -२०१७/प्र.क्र.२०/फ-२, दि. २३.१०.२०१७.

३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-३/योजनेत्तर/प्र.क्र.१८(१६-१७)/२०४१,दि.२७.०१.२०१७

शासन निर्णय :-

वन विभागाची पुनर्रचना या अनुषंगाने व्यवस्थापकीय माहिती प्रणाली अंतर्गत सांख्यिकी विषयक निर्माण केलेल्या २ पदांना सन २०१७-१८ मध्ये ०१.१०.२०१७ दि.३१.१२.२०१७ पर्यंत चालू ठेवण्यास संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयान्वये शासनाची मंजूरी देण्यात आली होती. सदर मुदत दि.३१.१२.२०१७ रोजी संपुष्टात येत आहे. खाली दर्शविलेल्या विवरणपत्रातील **२ अस्थायी पदे ही वन विभागाच्या २५०२५ या मंजूर आकृतीबंधात** समाविष्ट असल्याने सदर २ अस्थायी पदांना संदर्भ क्र.३ येथील पत्रान्वये प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने दि.०१.०१.२०१८ ते २८.०२.२०१८ पर्यंत चालू ठेवण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

वनवृत्त	**पदांचे नाव**	**संख्या**
नागपुर	सहायक वनसांख्यिकी	१
नाशिक	वनसांख्यिकी	१
	एकूण	**२**

२. याबाबत होणारा खर्च -प्रधान शीर्ष - २४०६-वनीकरण व वन्यजीवन (योजनेत्तर), ०१ वनीकरण, ००१ संचालन व प्रशासन (००१) वन सांख्यिकी (वेतने) (२४०६ ००५१)◦ या लेखाशीर्षा खाली दर्शविण्यात यावा व सन २०१७-१८ या वर्षी त्याखालील मंजूर होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा.या कालावधीमध्ये मंजूर पदांचा आढावा घेऊन, सुधारित आकृतीबंधास उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

३. प्रस्तुत शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.०८/१६/आ.पु.क., दि.०१.०८.२०१७ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०११८१४०३३०३८१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vijay Ramchandra Khedekar

Digitally signed by Vijay Ramchandra Khedekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b4a0f51184eb8e42644affc326f734133e2da973d24448c2cf323cb1cb2e347e, cn=Vijay Ramchandra Khedekar
Date: 2018.01.18 14:07:46 +05'30'

(विजय खेडेकर)
अवर सचिव
महसूल व वन विभाग

प्रतिलिपी :-

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर.

२) अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर

३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन - दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर

४) मुख्य वनसंरक्षक(प्रा.), नाशिक / नागपूर

५) मुख्य वनसांख्यिकी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय, नागपूर.

६) महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/ लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.

७) वित्त विभाग (व्यय १०/अर्थसं-४), मंत्रालय, मुंबई.

८) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.

९) जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर / नाशिक

१०) कार्यासन अधिकारी, ब-१, महसूल व वन विभाग,

११) निवडनस्ती, फ-२ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.